R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

E-mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : २

दि. ७ डिसेंबर २०२५, वार : रवीवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## देशाच्या विविधतेला एकत्र बांधणारे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले –राज्यपाल आचार्य देवव्रत

मुंबई: कोणत्याही राष्ट्रात युगपुरुष जन्माला येतात तेव्हा सामाजिक न्यायाची चळवळ बळकट होते. भारत हा विविधतेने नटलेला देश असून इतक्या मोठ्या राष्ट्रात एकता, न्याय व समाजाची संघटित भावना दृढ करण्यासाठी संविधान निर्माण करणे हे अत्यंत मोठे व ऐतिहासिक कार्य होते. देशाच्या सामाजिक विविधतेत सर्वांना एकत्र बांधणारे व समान अधिकार प्रदान करणारे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राला दिले, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.



मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार कालिदास कोळंबकर,आमदार चित्रा वाघ,आमदार अमित साटम, माजी खासदार तथा महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव, माजी खासदार राहुल शेवाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदींसह समाजाच्या सर्वक्षेत्रातील मान्यवर तसेच डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, एखादे व्यक्तिमत्त्व जगातून गेले तरी त्यांचे विचार व कार्य जनतेच्या अंत:करणात सदैव जिवंत राहतात, त्यातूनच बाबासाहेब अमर आहेत. कठोर परिस्थितीतून शिकून त्यांनी संपूर्ण समाजाचा भविष्यकाळ बदलण्यासाठी शिक्षणाला सर्वात मोठे शस्त्र मानले. एक सुशिक्षित व्यक्ती संपूर्ण घराचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य बदलू शकतो हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला.

### ज्ञानाच्या बळावर बाबासाहेबांनी समाजात समता प्रस्थापित केली– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमता दूर करून समाजात समता, बंधुता आणि सर्वांना समान संधी देणारे संविधान देशाला दिले. ज्ञानाच्या बळावर त्यांनी समाजात समतेची जाणीव दृढ केली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे. राष्ट्राच्या प्रगतीचा पाया बाबासाहेबांनीच घातल्याचे त्यांनी नमूद केले. ऊर्जा सुरक्षेच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांचे योगदान अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय विद्युत ग्रीडची संकल्पना भारताने बाबासाहेबांमुळे वेळेत स्वीकारली. त्यातून देश ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी आणि सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण हे बाबासाहेबांच्या संविधानामुळेच शक्य झाले, असेही श्री.फडणवीस यांनी स्पष्ट केले.

जगातील सर्वोत्तम संविधान भारताकडे असून प्रत्येक प्रश्नाचे उत्तर याच संविधानात मिळते, असे त्यांनी नमूद केले.आगामी काळात चैत्यभूमी परिसरातील स्मारक विकासाची कामे पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### महामानव बाबासाहेबांचे विचार राष्ट्राला मार्गदर्शक– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून देशाच्या लोकशाहीला दृढ पाया दिला. त्यांनी उभारलेला संघर्ष हा मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा होता, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ही बाबासाहेबांनी जगाला दिलेली त्रिसूत्री आजही समाज परिवर्तनासाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार मूल्यांवर आधारित संविधान तयार करून तळागाळातील वंचित व दुर्बल घटकांना सशक्त करण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. आंबेडकरांनी केले, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते सर्व भिक्खूंना चिवरदान देण्यात आले. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली. यावेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव यांनी सर्व मान्यवरांना संविधानाची प्रत दिली.

## डॉ. बाबासाहेब यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नामदेव हनवते, विश्र्वजीत हनवते यांच्या स्मरणार्थ फळे, पाणी वाटप

लातूर :- विश्र्वरत्न भारतरत्न बोधिसत्व, महामानव, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नामदेव सखाराम हनवते, विश्र्वजीत अशोक हनवते यांच्या स्मरणार्थ पानगाव येथे फळे, पाणी वाटप करण्यात आले. अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर, सौ रमा अशोक हनवते, विवेक उर्फ सोनू अशोक हनवते व हनवते परिवाराच्या वतीने पानगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आलेल्या अनेक आंबेडकरी अनुयायांना केळी व पाणी वाटप करण्यात आले. यावेळी विवेक हनवते व त्यांचे मित्र शुभम ससाणे,समाधान उजगीरे,प्रणव सुरवसे,अमर हिंगे,रामलिंग माने,अर्जुन वाघमारे,शिवगणेश आल्टे,गणेश दौतपुरे,तुषार आंबिलपुरे,अनिकेत वाघमारे,अभिषेक वाघमारे आदीने सहकार्य केले






विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पानगाव फाटा येथे युवा भीमसेनेच्या वतीने अन्नदान व फळे वाटप करण्यात आले. युवा भीम सेनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे, अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर, साधू भाऊ गायकवाड ब्लु पँथर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, आधी उपस्थित होते.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते सांगली शहरातील सत्ता प्रकार रुपांतरीत मिळकत पत्रिका नक्कलचे वितरण

सांगली (जि. मा. का.) : सांगली शहर येथील खणभाग सि.स.नं. १ मधील खाजगी मिळकत धारक यांचे सत्ता प्रकार 'एल' मधून 'ए' मध्ये रुपांतरीत केलेल्या मिळकत पत्रिका नक्कलचे वितरण राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आले.




जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सुरेखा सेठीया, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी शिवाजी जगताप, नगर भूमापन अधिकारी, कर्मचारी, मिळकतींचे मिळकत धारक उपस्थित होते.

सांगली शहर खणभाग येथील सत्ता प्रकार 'एल' या धारणाधिकार सत्ताप्रकाराच्या शासकीय जमिनीचे 'ए' या सत्ताप्रकारात रूपांतरण करण्याबाबत महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजीच्या निर्णयानुसार एकूण ६४ मिळकतीचे रूपांतरण करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये ६० मिळकतीस जिल्हाधिकारी यांच्याकडील दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशाने मिळकतीवर फेरफार घेण्यात आला. सदर मिळकत पत्रिकेस सत्ताप्रकार 'एल' (सरकारी जागा व इमारती) हा १९२८ साली दाखल झाला होता. तो 'ए' करण्यात आल्यावर संबंधित मिळकत धारकास दिलासा मिळाला आहे. झालेल्या कार्यवाहीबाबत मिळकत धारकांनी समाधान व आभार व्यक्त केले.

## १३ डिसेंबरच्या लोकअदालतीत ई-चलान तडजोड प्रकरणे स्वीकारली जाणार नाहीत; नागरिकांनी अफवांना बळी पडू नये

मुंबई : येत्या १३ डिसेंबर २०२५ रोजी राज्यभर आयोजित करण्यात येणाऱ्या लोकअदालतीमध्ये ई-चलान प्रकरणांची तडजोड स्वीकारली जाणार नाही, असे स्पष्टिकरण अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहे.




सन २०२१ पासून प्रलंबित ई-चलान प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी वाहतूक विभागाकडून महाराष्ट्र राज्य विधी आणि सेवा प्राधिकरणाच्या मंजुरीने प्रयत्न केले जात आहेत. मात्र आगामी लोकअदालतीत वाहतूक विभागाकडून कोणतीही ई-चलान प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार नाहीत, असे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, काही यूट्यूब, इंस्टाग्राम तसेच अन्य सामाजिक माध्यमांवर १३ डिसेंबरच्या लोकअदालतीत ई-चलान दंडात सवलत मिळणार असल्याचा खोटा प्रचार केला जात असल्याचेही निदर्शनास आले आहे. अशा अफवांमुळे नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असल्याने पोलीस विभागाने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे.

वाहतूक विभागाचे नागरिकांना आवाहन ई-चलान तडजोड किंवा दंडात सवलत याबाबत सामाजिक माध्यमांवरील अपप्रचारावर विश्र्वास ठेऊ नये. कोणत्याही अनधिकृत लिंकद्वारे ई-चलानची रक्कम भरणा करू नये. जर एखाद्या नागरिकाचे प्रकरण स्थानिक जिल्हा विधी व सेवा प्राधिकरणाने तडजोडीसाठी ठेवले असल्यास, संबंधित न्यायालय किंवा स्थानिक वाहतूक पोलीसांशी थेट संपर्क साधावा, असे पोलीस अधीक्षक (मुख्यालय) सुनील भारव्दाज यांनी अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाच्या वतीने कळविले आहे.

## संपादकीय...

### संविधानाचे रक्षण-बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनाची खरी आदरांजली

६ डिसेंबर हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाचा, पण त्याचबरोबर भारताच्या लोकशाहीचे आत्मचिंतन करण्याचा दिवसही आहे. संविधानाच्या निर्मितीमध्ये त्यांनी बजावलेल्या नेतृत्वामुळे आजचा भारत उभा आहे–अनेकतेतील ऐक्य, समानतेचे हक्क, स्वातंत्र्याचे मूल्य आणि न्यायाची हमी या सगळ्यांचे केंद्रस्थान भारतीय संविधान आहे. आज महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने प्रश्न केवळ स्मरणाचा नाही; प्रश्न आहे–आपण संविधानाचे रक्षण करत आहोत का ?संविधान : आजच्या भारताचे नैतिक आरसेडेपीींळ्ीींळेप ष खपवळर हे फक्त कायद्यांचे पुस्तक नाही; ते भारताच्या सामाजिक बांधणीचे स्वप्न आहे.पण आज या आरशात दिसणारा समाज अनेकदा चिंताजनक वाटतो. जातीय भेद, धार्मिक ध्रुवीकरण, स्त्री–पुरुष असमानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर टाकले जाणारे बंधन–हे सर्व संविधानाच्या मूल्यांवर थेट आघात करणारे आहेत.संविधानाने नागरिकांना हक्क दिले, पण त्याचबरोबर कर्तव्यांची जबाबदारीही सोपवली. तथापि, आपण हक्कांबद्दल सजग आहोत, पण कर्तव्यांकडे दुर्लक्ष अधिक. भारतीय लोकशाहीची सर्वात मोठी शक्ती–समानता बाबासाहेबांनी सांगितले होते की समाजात समानता नसेल तर लोकशाही टिकणार नाही.आजही भारतीय समाजात सामाजिक आणि आर्थिक विषमता वाढताना दिसते. उच्च शिक्षण, तंत्रज्ञान, आर्थिक प्रगती–या क्षेत्रांत मोठ्या संख्येने लोक मागे पडत आहेत.संविधानाने दिलेली समानतेची संकल्पना ही फक्त न्यायालयातील हक्क नाही; ती समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या उभारीची पायाभरणी आहे. संविधानाचे रक्षण–फक्त न्यायालयाचे काम नाही रोजच्या जीवनातील लहानशा कृतीतूनही संविधानाचे मूल्य जपता येते : धर्म–जात यांच्या आधारावर द्वेष न पसरवणे महिलांना समान संधी देणेकमजोर घटकांना साथ देणे कायद्याचा सन्मान राखणे विज्ञाननिष्ठ वृत्ती रुजवणे लोकशाहीचा कणा म्हणजे जनतेचे विवेकबुद्धीने चालणारे सक्रिय नागरिकत्व. ही लोकशाही टिकवणे म्हणजे संविधानाचे रक्षण. संविधानावर आजची सर्वात मोठी कसोटीआज भारत एका विचित्र द्वंद्वात उभा आहे– एका बाजूस वेगाने विकसित होणारे आधुनिक राष्ट्र, तर दुसऱ्या बाजूस तुटत जाणारा सामाजिक संवाद. संविधान बदलण्याची किंवा पुनर्व्याख्या करण्याची चर्चा वारंवार पुढे येते. विचारसरणी भिन्न असू शकते, पण संविधानाचे मूल्य बदलू शकत नाहीत. भारतीय लोकशाहीची स्थिरता हेच दाखवते की संस्था टिकतात, पण तत्त्वे अधिक टिकाऊ असतात. समारोप : बाबासाहेबांचे विचार–संविधानात, संविधान भारतात महापरिनिर्वाण दिनाला लाखो लोक बाबासाहेबांना वंदन करतात, पण त्यांच्या विचारांना वंदन करणे अधिक महत्त्वाचे. त्यांच्या विचारांचे केंद्रबिंदू काय होते?– न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व. ही चार मूल्ये जगली तरच भारत खरा संविधानात्मक राष्ट्र बनेल. राजकीय वातावरण कसेही असू दे, काळ कोणताही असू दे–एक सत्य कायम आहे :संविधान जिवंत आहे, कारण बाबासाहेबांचे विचार जिवंत आहेत.

# प्रिय बाबासाहेब

आपणास अभिवादन करण्याच्या निमित्ताने काही विषयावर संवाद व्हावा यासाठीच हा पत्र प्रपंच.

तुम्ही जे निर्माण करून ठेवलात त्यात आम्ही कोणती भर घातली? असा प्रश्न आम्ही स्वतःलाच विचारला तर त्याचे उत्तर नाही असेच येईल.गोऱ्यांच्या राजवटीखाली या देशाने आपली स्वतःची,अशी ओळख काही दशकापुरती गमावली होती.प्रथम हा देश बुद्धांचा नंतर गांधींचा म्हणून ओळखला जात होता. आता तो तुमच्या नावाने ओळखला जाऊ लागला.सध्या हा देश एका अरिष्टात अडकलेला आहे. ते अरिष्ट राजकीय,सामाजिक,आणि सांस्कृतिक गुंतागुंतीच आहे.स्वातंत्र्यानंतर समतेच, बंधुत्वाचं आणि लोकशहीच स्वप्न पाहणारा हा देश संक्रमण अवस्थेच्या वर्तमानात जगत आहे.

खरंतर विषम व्यवस्थेच्या छाताडावर पाय देऊन इथे समता भूमी निर्माण करण्याचं आमचं ध्येय पूर्णत्वास जाऊ शकले नाही. त्याबद्दल आम्ही तुमची माफी मागून स्वतः ला आत्मक्लेष करून घेण्याइतपत थोर नाही.तुम्ही उभ्या केलेल्या घराच्या भिंतीचा एक एक चिरा हळूहळू निखळत चाललाय. इथे धर्म श्रेष्ठत्वाच्या तत्त्वज्ञानामुळे समतेचे तत्त्वज्ञान समाजामध्ये रुजवायला आम्हीच कमी पडलो. त्याला आमच्यातलेच काही जबाबदार आहेत.विचारांची लढाई ही विचारानेच लढली पाहिजे. एवढेच नव्हे तर इथली राजकीय सामाजिक आणि सांस्कृतिक,सत्ता सुद्धा समतेच्या तत्त्वज्ञानाने लढून (धर्मांध शक्तीसी हात मिळवनी करून नव्हे) मिळवली पाहिजे.आजही या देशातील दीनदलितांच्या समस्या डोंगराएवढ्याच आहेत. त्या कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस अधिक वाढत आहेत. मात्र हा समस्यांचा डोंगर उध्वस्त करण्यासाठी अजून पुढाकार घेतला जात नाही.

तुमचा विचार विधायक मार्गाने पुढे नेण्यासाठी सध्या तरी कुणी पुढाकार घेताना दिसत नाही. मात्र तुमच्या नावाचा उदो उदो करण्यासाठी सगळेजण आपली ५६ इंच छाती काढून पुढे सरसावतात. जयभीम के नाम पे खून बहे तो बहेने दो असा आवेश आणतात.अलीकडे मध्यमवर्गीय जाणीव आमच्यामध्ये हळूहळू शिरकाव करू लागली आहे. जगण्या मरण्याच्या हक्कासाठी संघर्ष करीत मेरिटमध्ये स्थान मिळवणाऱ्या समाजाच्या संवेदना जेव्हा बोथट होतात आणि तो समाज अहमभौतिक सुखाच्या मागे लागतो तेव्हा तो वैचारिक लढाईपासून अलिप्त होतो.आम्हीही त्याच मार्गावर आहोत हे वास्तव स्वीकारायला थोडा वेळ लागेल.

कोटी कोटी कुळांचा उद्धार करणारा तुमचा क्रांतिकारी विचार आज शतकानंतर विषमतेच्या गडद अंधारामध्ये माणूस शोधण्याचा प्रयत्न करीत आहे.मान्य आहे, शत्रूच्या रेटयापुढे आम्ही संख्येने,द्रव्याने,आणि गनिमी आखाड्याने टिकू शकणार नाही. हम टिक नही सकते,लेकिन मिट भी नहीं सकते, या उक्तीप्रमाणे तुमचा विचार ज्वलंत ठेवण्यासाठी आम्ही स्वतःहाशी तह करू, आणि जाताना इथल्या मातीत समतेच्या विचारांची पाळेमुळे घट्ट राहतील याचा बंदोबस्त करू जेणेकरून तुम्ही उगवलेल्या लखखउजेडात अंधाराची कुस पुन्हा जागा घेणारच नाही.हेच तुम्हाला अभिवादन ठरेल.

**प्रदीप नाईक.८६५२५६५८२१**

# महामानवाच्या स्मृतीतून मनाला भिडणारा महापरिनिर्वाण दिन

६ डिसेंबर हा भारतीय इतिहासातील एक भावस्पर्शी, चिंतनशील आणि आत्मपरीक्षणाचा दिवस. हा फक्त एका महामानवाच्या देहपरीत्यागाचा दिवस नाही; हा त्या महामानवाच्या विचारज्योतीचा पुनर्जन्मदिन आहे. हा दिवस मानवी स्वाभिमानाची, लोकशाही संस्कृतीची आणि सामाजिक परिवर्तनाची आठवण करून देणारा दिवस आहे. हा दिवस कॅलेंडरवरील फक्त एक दिवस नाही. तो एका महामानवाच्या देहपरीत्यागाचा क्षण असला, तरी त्याच क्षणी त्याच्या विचारांचा जन्म झाला; विचारांच्या क्रांतीची अक्षय ज्योत प्रज्वलित झाली. हा दिवस केवळ शोकाचा नाही; तो अंतर्मनाची जागृती, समाजपरिवर्तनाचा संकल्प आणि लोकशाही संस्कृतीच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. हा दिवस केवळ बाबासाहेबांच्या स्मृतींचा दिवस नसून, न्याय, समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांना नव्याने जागवणारा दिवस आहे. हा दिवस भारतीय समाजाला आत्मचिंतनाची, जागृतीची आणि कृतज्ञतेची साक्ष देणारा 'महापरिनिर्वाण दिन' म्हणून साजरा केला जातो. महापरिनिर्वाण दिन हा स्मरणाचा नाही, तर संकल्पाचा दिवस आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याचा संकल्प, अंधश्रद्धा, असमानता आणि वर्णभेद मोडून काढण्याचा संकल्प आणि शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा या मंत्राला कृतीत आणण्याचा संकल्प. शिक्षण हेच परिवर्तनाचे शस्त्र, अन्यायाविरुद्ध संघर्षाची ठाम भूमिका आणि संघटित समाज हीच खरी ताकद आहे. बाबासाहेब गेले, पण त्यांचे विचार अमर झाले म्हणूनच 'महापरिनिर्वाण' म्हणजे अंत नव्हे, तर एका विचारक्रांतीचा नवा आरंभ! ाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व केवळ एका महान नेत्याचे नव्हे, तर विचारांचे विश्र्व होते. गरीब, वंचित, बहिष्कृत आणि शोषित समाजाला त्यांनी कायद्याचा आधार दिला, शिक्षणाची ताकद दिली आणि जगण्याचा स्वाभिमान दिला. मी जन्मलो अंधारात, पण संघर्षाच्या प्रकाशाने जग उजळून टाकले, ही केवळ त्यांची कथा नाही, तर संपूर्ण भारतीय समाजाची नवचैतन्याची कहाणी आहे. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हे फक्त कायद्यांचे पुस्तक नाही, ते मानवतेचे पवित्र ग्रंथ, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे चार अतूट स्तंभ आहेत. ते फक्त वाचायचे नाहीत, ते जगायचे आहेत. पण आज आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा, आपण या मूल्यांना खरंच जगत आहोत का? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दोन गोष्टी दिल्या, एक म्हणजे जागृक बुद्धी आणि दुसरी म्हणजे जागृत वैचारिक जबाबदारी. आज आपण त्यांना श्रद्धांजली वाहतो तेव्हा फुलांच्या हारात ते समाधानी नसतात; ते समाधानी असतात, जेव्हा आपण त्यांच्या विचारांच्या अंगाऱ्याला कृतीच्या श्र्वासाने तेज देतो. फुले आणि शब्द वाहून चालणार नाही; विचारांची कृतीमय वाहतूक ही खरी अभिवादनमय श्रद्धांजली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून देशाला कायदे, अधिकार आणि स्वाभिमान दिला. त्यांनी केवळ समाजाच्या उपेक्षित, शोषित घटकांना आवाज दिला नाही, तर संपूर्ण भारताला 'मानव म्हणून जगण्याची कला' शिकवली. त्यांचे विचार, तत्त्वज्ञान आणि संघर्ष आजही प्रकाशस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. त्यांचे जीवन मुठीत माती घेऊन सुरू झाले पण त्या मातीला त्यांनी ज्ञानाच्या सुवर्णकणांनी समृद्ध केले. जगभरातील ४० दशलक्षांहून अधिक गुलाम मनांना त्यांनी विचारांचा उधाण दिला. जन्मानं हीन, पण कर्मानं महान होण्याची प्रेरणा त्यांनी दिली, शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा, हीच महानायकाची अखेरची शिकवण. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञान, संघर्ष आणि स्वाभिमानाची जिवंत शाळा. ते म्हणाले होतेमला माझ्या मृत्यूनंतर पाहायचे असेल, तर माझ्या समाधीवर येऊ नका; माझ्या विचारांकडे पाहा, माझ्या पुस्तकांकडे पाहा, माझ्या संघर्षाकडे पाहा, कारण तिथेच मी जिवंत आहे!



६ डिसेंबरला आपण लाखोंच्या संख्येने मुंबईतील चैत्यभूमीवर जमा होतो; मेणबत्त्या लावतो, पण आपण अंतर्मनात विचारांची ज्योत पेटवतो का? बाबासाहेबांच्या समाधीवर मेणबत्त्या लावता–लावता आपण आपल्या अंतर्मनातील मेणबत्ती प्रज्वलित करतो का? ६ डिसेंबर आपल्याला एक प्रश्न विचारतो, आपण बाबासाहेबांना फक्त वंदन करतो, की त्यांच्या विचारांची वंदनीय कृती करतो? आपण समाज बदलतो की समाजाकडून फक्त भावनिक शब्द घेतो? त्यांनी दिलेल्या संविधानाच्या दिव्यज्योती भोवती आपण सजावट करतो की त्या ज्योतीने अंधारात प्रकाश आणतो? मृत्यू एखाद्या व्यक्तीचा होतो, पण विचार अमर होतो. डॉ. आंबेडकर देहाने गेले, पण त्यांनी दिलेला संविधानाचा श्र्वास आजही जिवंत आहे. त्यांची बौद्ध धम्माकडे झेप, ही आध्यात्मिक नाही; ती मानवी प्रतिष्ठेची समानतेची क्रांती होती हीच महामानव आणि आपली जाणीव आहे. त्यांनी शेवटी म्हटलं होतं, मी हिंदू म्हणून मारणार नाही हे धार्मिक वाक्य नव्हतं, ते मानवी अस्मितेचं घोषणापत्र होतं. आजची अत्यंत गरज आहे बाबासाहेबांना समजून घेणे, फक्त पाठ करणे नाही. समाजाला मसिहा नको, समाजाला मार्गदर्शक हवा. देणाऱ्याला देव बनवून थांबू नका तर त्याचा विचार देवत्वाने जगवा. बाबासाहेबांची शिकवण तांत्रिक नाही; ती जीवनतत्त्वज्ञान आहे. ती तत्त्वज्ञान फक्त उधृत केल्याने नाही, तर जगल्याने प्रभावी होते.

आज विषमता, धार्मिक कट्टरता, जातीगत द्वेष, आर्थिक अन्याय पुन्हा समाजाला जखडू पाहत आहेत. अशा वेळी बाबासाहेब जागृत स्वरात आपल्याला आठवण करून देतात राजकीय स्वातंत्र्य व्यर्थ आहे, जोपर्यंत सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळत नाही. आजच्या परिस्थितीत हे वाक्य विशेषतः ठामपणे जाणवते. बाबासाहेब म्हणाले होते, मी ज्या समाजासाठी लढलो, तो समाज जर झोपला तर माझे कार्य अपूर्ण राहील. म्हणूनच आज ६ डिसेंबरच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांचा दीप पुन्हा प्रज्वलित करू या. आज बाबासाहेबांची गरज पुतळ्यांत नाही, तर मनांत आहे. त्यांच्या विचारांची गरज केवळ ग्रंथांत नाही, तर कृतीत आहे. त्यांच्या लोकशाहीची गरज केवळ संविधानात नाही, तर समाजव्यवस्थेत आहे. महापरिनिर्वाण दिन हा स्मरणाचा नव्हे, संकल्पाचा दिवस आहे. मी जातभेद मोडीन, समतेची वीट बनेन, मी संविधान फक्त वाचणार नाही, तर त्याचा रक्षक बनणार तसेच, मी बाबासाहेबांना स्मरणार नाही तर त्यांच्या विचारांना स्मरणीय करीन, हीच आजची आजची सशक्त प्रतिज्ञा आहे. म्हणून त्यांची शेवटची ओळ जो प्रत्येकाने मनात कोरावी, बाबासाहेबांनी आपल्याला मुक्त केले, पण मुक्ततेची किंमत आपण जपू शकतो का? खरी प्रतिज्ञा अशी असावी. ही जाणीव, ही जागृती, ही जबाबदारी, यालाच आपण म्हणू शकतो महापरिनिर्वाणाची खरी श्रद्धांजली! आज डॉ. आंबेडकर आपल्यात नाहीत, पण त्यांचे विचार आपल्यात आहेत. ते विचार आपल्याला सजग करतात, सशक्त करतात, आणि माणूस म्हणून जगण्याची कला शिकवतात. ज्या समाजात मनुष्य मनुष्याचा शत्रू नाही, ज्या समाजात बंधुता हीच खरी संपत्ती आहे, असा समाज घडवण्याचे स्वप्न बाबासाहेबांचे होते. हे स्वप्न जगणे, जपणे आणि पुढील पिढीकडे पोहोचवणे हेच खरे महापरिनिर्वाण! विचार अमर आहेत. मेणबत्तीच्या प्रकाशापेक्षा अंतर्मनाचा प्रकाश उजळवू या. महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भावपूर्ण आदरांजली !

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डिजिटल संविधान चित्ररथाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

मुंबई : राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डिजिटल संविधान चित्ररथ तयार करण्यात आलेला आहे. या चित्ररथाचे आज ६ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रवींद्र नाट्य मंदिराच्या प्रांगणात, प्रभादेवी मुंबई येथे उद्घाटन करण्यात आले.



याप्रसंगी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, पु ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक श्रीमती मीनल जोगळेकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

हा चित्ररथ राज्यात विविध ठिकाणी फिरणार आहे. या चित्ररथामध्ये संविधानाची माहिती, संविधानाच्या मुलतत्त्वावरील माहिती, महत्त्वाची घडामोडी व लोकशाहीच्या मुल्यांवरील कलात्मक सादरीकरण व याबाबतचे प्रदर्शन बघायला मिळेल. या चित्ररथाद्वारे संविधान बाबतची जनजागृती करण्यात येणार आहे. संविधानाची माहिती सर्वसामान्यांना माहित व्हावी, या उद्देशाने या चित्ररथाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

राज्यातील जास्तीत जास्त जनतेने या चित्ररथ प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दीक्षाभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त केले अभिवादन

नागपूर : महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नागपूर येथील दीक्षाभूमी येथे राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिवादन केले.



यावेळी त्यांच्या समवेत महेंद्र प्रधान, माजी आ. डॉ. मिलिंद माने, सतिश सिरसवान, बाळु रारोकर, नेताजी गजभिये, सागर जाधव, राहुल उके, अभिताभ मेश्राम, निनाताई सोमकुवर, हेमलताताई जिभे, हर्षद खंडारे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यातील कोष्टगावचा शेतकरी युवक नरहरी डाके 'केबीसी'मध्ये ठरला विजेता

लातूर (प्रतिनिधी):रेणापूर तालुक्यातील कोष्टगावातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील नरहरी अंकुश डाके उर्फ 'आबा' यांनी 'कोण बनेगा करोडपती' (घइउ) या सुप्रसिद्ध ज्ञानस्पर्धेत आपल्या बुद्धिमत्ता आणि चिकाटीच्या जोरावर तब्बल २५ लाख रुपये, इलेक्ट्रिक स्कूटी, दोन वर्षे लागणारे गोवर्धन तूप, तसेच इतर आकर्षक पारितोषिके जिंकून संपूर्ण लातूर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.



अत्यंत साध्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या नरहरी डाकेंच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न भाजीपाला, दूध विक्री आणि आठवडी बाजारातून अवघे ८ ते १० हजार रुपये एवढेच. कर्जबाजारीपणाने दबलेल्या या कुटुंबाने अनेक कठीण प्रसंग झेलले–कधी गोठ्यातील म्हशी विकाव्या लागल्या, तर कधी कर्ज फेडण्यासाठी पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र विकावे लागले. मात्र या साऱ्यावर मात करत नरहरी यांनी मोबाईल, युट्युबचा अभ्यासासाठी योग्य उपयोग करून घइउ मध्ये सहभागी होण्याचे स्वप्न साकार केले.

दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी अमिताभ बच्चन यांच्या सूत्रसंचालनाखाली झालेल्या थेट प्रक्षेपणात नरहरी यांचा उत्साह, आत्मविश्र्वास आणि ज्ञानाचा थरारक खेळ पाहून संपूर्ण सभागृह भावूक झाले. त्यांच्या संघर्षमय आयुष्याची कहाणी ऐकून बिग बी सुद्धा काही काळ स्तब्ध झाले.

नरहरी यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबाचा मोठा हातभार आहे. वडील अंकुश डाके वारकरी संप्रदायातून कीर्तन–प्रवचन करीत समाजजागृतीचे कार्य करतात. मोठे भाऊ अविनाश डाके आणि वहिनी वंदना डाके हे दिवेगाव जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असून कठीण काळात त्यांनीही मोठा आधार दिला. बारावीनंतर बी.एस्सीचे केवळ दोन वर्ष शिकूनही नरहरी यांनी प्रचंड मेहनतीने केबीसीचा सखोल अभ्यास केला व आज यशाच्या शिखरावर पोहोचले.

या उल्लेखनीय यशानंतर कोष्टगाव, रेणापूर तसेच लातूर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. श्री. अविनाश डाके यांच्या घरी काशीलिंगेश्र्वर नगर, अंबाजोगाई रोड येथे आयोजित सामूहिक सत्कार कार्यक्रमात प्रा. जयपाल पाटील फड, प्रा. डॉ. केशव आलगुले, विठ्ठल कुरमुडे, माऊली घुले,श्री.राम मुंढे, श्री. धोंडीराम चिल्लरगे, श्री.पांडुरंग सपकाळ सर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# माफसू येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

नागपूर -महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून तसेच संचालनालय विस्तार शिक्षण कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी विनम्र अभिवादन केले.

या प्रसंगी अधिष्ठाता (निम्नशिक्षण) व विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. भूषण रामटेके, परीक्षा नियंत्रक डॉ. एन. सी. नंदेश्र्वर, उपकुलसचिव डॉ. अजय गावंडे, तांत्रिक अधिकारी डॉ. महेश जावळे, डॉ. संजय गोडबोले, डॉ. गिरीधर शेंडे, डॉ. सरिपुत लांडगे, डॉ. गीतांजली धुमे, तांत्रिक अधिकारी व अध्यक्ष कास्टट्राइब माफसू एम्प्लॉईज युनियन डॉ. प्रज्ञेय ताकसांडे, सहायक नियंत्रक रामराव किर्तने, संचालक विस्तार शिक्षण यांचे स्विय सहाय्यक व उपाध्यक्ष कास्टट्राइब माफसु एम्प्लॉईज युनियन श्री प्रवीण बागडे, इंजि.आर. के. सावरकर, संतोष बन्सोड, गौरी भदोरिया, बाळू छपाणे, मिलिंद आठवले ई. उपस्थित होते.

# नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रातील शेतकऱ्यांना चठएत्रड योजनांचा त्वरित वैंयक्तीक लाभ मिळावा - लोकसभेत खासदार ओमराजे निंबाळकर

नवी दिल्ली - महाराष्ट्रातील नगरपालिका




आणि नगरपंचायत क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या महात्मा गांधी ग्रामीण राष्ट्रीय रोजगार हमी योजनांचा माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा समान हक्काने लाभ मिळावा, अशी ठाम मागणी आज लोकसभेच्या शून्य प्रहरामध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केंद्र सरकारकडे केली.

खासदार निंबाळकर यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की या नगरपालिका हद्दीमध्ये वास्तव्यास असणाऱ्या हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असूनही, त्यांना केवळ नगर पालीका क्षेत्रात वास्तव्यास असल्यामुळे अनेक चठएत्रड योजनेच्या पात्रतेतून वगळल जाते. त्यामुळे शेतकरी विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहतो.

खासदार निंबाळकर यांनी सभागृहात स्पष्टपणे नमूद केले:

नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतरस्ते, गाय-गोठा, वैयक्तिक विहीर, फळबाग लागवड, तुती लागवड यांसारख्या चठएत्रड योजनांचा त्वरित लाभ द्यावा. ग्रामीण भागातील शेतकरी आणि नगरपालिका क्षेत्रातील शेतकरी यांच्यात असा भेदभाव होऊ नये.

त्यांनी पुढे सांगितले की–शासनाच्या कृषी अनुदान, पायाभूत सुविधा आणि पशुपालन योजनांचा विस्तार या भागात केला तर:

शेती उत्पादन आणि उत्पन्न वाढेल

* पाणी व सिंचन व्यवस्थेत सुधारणा होईल
* फळबाग आणि तुती लागवड प्रोत्साहनामुळे टिकाऊ शेती उभी राहील
* पशुपालनावर आधारित आर्थिक स्वावलंबन तयार होईल

खासदार निंबाळकर यांनी केंद्र सरकारकडे केलेल्या प्रमुख मागण्या:

१. नगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना ग्रामीण क्षेत्रातील शेतकऱ्यांप्रमाणे समान लाभ द्यावा

२. सर्व कृषी व पशुसंवर्धन संबंधित योजना या क्षेत्रांसाठी तात्काळ खुल्या कराव्यात

३. निकष बदलून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला अनुदान, मंजुरी व तांत्रिक मदत उपलब्ध करून द्यावी.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त लातूर पूर्व भागात मशाल,कॅण्डल मार्च

लातूर/ प्रतिनिधी :- लातूर शहराच्या पूर्व भागात विश्र्वरत्न बोधिसत्त्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेली सामाजिक परंपरा यंदाही उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

इंदिरा नगर महाबोधी बुद्ध विहार येथून सकाळी १०:३० वाजता मशाल आणि कॅण्डल हाती घेत भव्य शांतता मार्च सुरू झाला. विविध समाजघटकांच्या मोठ्या सहभागामुळे मार्चला विशेष वैशिष्ट्य प्राप्त झाले. हा मार्च दुपारी १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे पोहोचला.

मार्चच्या समारोपानंतर नेमक्या १२:०० वाजता सर्व उपस्थितांनी त्रिशरण व पंचशील ग्रहण करून बाबासाहेबांना अभिवादन केले. समता, बंधुत्व आणि करुणा–हा बाबासाहेबांनी दिलेला संदेश इंदिरा नगर परिसरातील नागरिक गेली अनेक वर्षे आचरणात आणत असल्याचे यावेळी बोलताना



आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या आयोजनात रुपेश गायकवाड, मयूर बनसोडे, नागेश कांबळे, जितेंद्र गायकवाड, राहुल बनसोडे, अरुण सूर्यवंशी, नितीन पडसाळे, विजय अवचारे, रवी शिरसाठ, ओम कांबळे, राहुल पात्रे, राजू गवळी, निलेश डूमने, सचिन कांबळे, करण जकाते, बालिका कांबळे, तनुजा कांबळे, सोनाली गायकवाड, वंदना पात्रे यांसह अनेक महिला व पुरुष नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी समता, बंधुत्व आणि प्रेम हा बाबासाहेबांचा मानवतावादी संदेश आचरणातून जपण्याची प्रतिज्ञा केली.

जर तुम्हाला या प्रेसनोटचे ई–मेल फॉरमॅट, छोटा टीझर व्हर्जन, फोटो कॅप्शनसह आवृत्ती, किंवा इंग्लिश प्रेसरिलीज हवी असेल तर मला कळवा.

# राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेचे किरण जाधव यांच्या हस्ते उद्घाटन.

लातूर /प्रतिनिधी :- प्राप्त ऑलिम्पिक क्रीडा प्रकारात तायक्कांदो या खेळाची ३५ वी वरिष्ठ गट महिला व पुरुष अजिंक्यपद स्पर्धेचे लातूर शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष ड किरण जाधव यांच्या हस्ते उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. राज्यातून २८ जिल्ह्यातील



३२० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग झाले असून आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रुतीका टकले, शिवम शेट्टी, मृणाली हरणेकर यांचाही या स्पर्धेत सहभाग असून त्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. औसा रोड वरील जिल्हा क्रीडा संकुलात तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई यांच्या मान्यतेने तायक्कांदो असोसिएशन ऑफ लातूर यांच्या वतीने या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे , अशी माहिती जिल्हा संघटनेचे सचिव नेताजी जाधव यांनी दिली आहे. उद्घाटन प्रसंगी ड किरण जाधव म्हणाले की, आजच्या युगात मुलं इलेक्ट्रॉनिक माध्यमात गुंतलेली आहेत, त्यांना मैदानावर आणणे आता शक्य होत नाही. त्यामुळे तायक्कांदो सारख्या मार्शल आर्ट खेळाची सवय बालवयापासूनच खेळाडूंना

शासन मान्यता लावणे गरजेचे झाले असून यासाठी आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वात क्रीडाविषयक विशेष पावले उचलावी लागणार आहेत असे मत यावेळी त्यांनी बोलताना व्यक्त केले आहे. तायक्कांदो या खेळाला आंतरराष्ट्रीय दर्जा असून शासकीय स्तरावर विविध फायदे खेळाडूंना मिळवता येतात.

खेळाडूंनी मोठ्या संख्येवर तायक्कांदो या मार्शल आर्ट सारख्या स्व–संरक्षण करता येणाऱ्या खेळाकडे वळले पाहिजे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा तायक्कांदो राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. यावेळी बोधिसत्व विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्यासपीठावर प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या राज्यस्तरीय स्पर्धा दिनांक ५ डिसेंबर रोजी सुरू झाल्या असून त्याचा समारोप रविवारी दिनांक ७ डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे. याप्रसंगी तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाचे सहसचिव तथा स्पर्धा निरीक्षक मिलिंद पठारे यांची विशेष उपस्थिती होती तर राज्य संघटनेचे उपाध्यक्ष दुलीचंद मेश्राम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण बोरसे व सुभाष पाटील, मुंबई जिल्हा सचिव विजय कांबळे, कोल्हापूर जिल्हा सचिव कृष्णा जंगम, लातूर काँग्रेस मीडिया सेलचे प्रमुख प्रवीण सूर्यवंशी, लातूर मनपा माजी नगरसेवक गिरीश ब्याळे, धनाजी घाटे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते लाला भिल्लारे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना लातूर तायक्कांदो जिल्हा संघटनेचे सचिव तथा आशियाई तायक्कांदो प्रशिक्षक नेताजी जाधव यांनी केले तर आभार दुलीचंद मेश्राम यांनी मांडले. स्पर्धा यशस्वीतेसाठी एस व्ही कुलकर्णी, धनश्री मदने, जान्हवी मदने, डॉक्टर दिपाली ममदे, भारती सुवर्णकार, विश्र्वजीत जाधव, आकाश मिरगे, गीतांजली नागरगोजे, रागिणी शिरसागर, अनुश्री कुलकर्णी आदी खेळाडू परिश्रम घेत आहेत

# एकनाथ शिंदेंनी डाव टाकला, महिला नेत्याचा शिवसेनेत प्रवेश, उद्धव ठाकरेंची चिंता वाढली

मुंबई: आगामी महापालिका निवडणुकीपूर्वी राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. त्यामुळे नेत्यांनीही पक्षांतर करायला सुरुवात केली आहे. काही दिवसांनी महानगर पालिकांच्या निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. यात कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या निवडणुकीचाही समावेश आहे. अशातच आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीमध्ये विविध विकास कामांचे उद्घाटन केले. एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीमध्ये विविध विकास कामांचे उद्घाटन केले. याच कार्यक्रमावेळी शिंदेंना उद्धव ठाकरेंना एक मोठा धक्का दिला आहे. एका महिला नेत्याने आज शिवसेनेत प्रवेश केला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



मंगला सुळे यांचा शिवसेनेत प्रवेश डोंबिवलीतील शिनसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माजी नगरसेविका मंगला सुळे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितित हा पक्ष प्रवेश पार पडला. डोंबिवली पश्र्चिमेत माझी नगरसेवक विकास मात्रे यांच्या शिवसेना संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन केल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह मंगला सुळे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. मंगला सुळे या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात येण्याआधी भाजपच्या माझी नगरसेविका होत्या. आता त्यांनी शिवसेनेच्या साथीने जनतेची सेवा करण्याचा निर्णय घेतला आहे.

आज डोंबिवली चखऊ अंतर्गत सावळाराम क्रीडा संकुलाच्या लोकार्पण आणि विकास कामाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , मंत्री उदय सामंत, खासदार श्रीकांत शिंदे, भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

लाडकी बहीण योजना महायुती विसरणार नाही – शिंदे या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, मी जिथे जिथे सभा करतो कार्यक्रम करतो तिथे तिथे लाडक्या बहिणींची संध्या पहायला मिळते. ऋलाडकी बहीण योजना महायुती विसरु शकणार नाही आणि विरोधक ही विसरु शकणार नाहीत. ऋमी नेहमी सही करतो कारण समोरच्याला समाधान वाटावे. महायुती म्हणून मी आणि देवेंद्रजींनी खुप विकास कामे केली आहेत. आपत्ती तिथे एकनाथ शिंदे. रवींद्र चव्हाण बरोबर बोलले चचठऊ- चा निधी महायुतीमुळे या शहरांना मिळू लागला आहे. ऋमहाराष्ट्र सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे. याचा अभिमान आहे. दिलेला शब्द मी पाळणारा आहे असं त्यांनी म्हटले आहे.

# महापरिनिर्वाण दिन - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन

लातूर / प्रतिनिधी :-जगातील महान सामाजिक क्रांतीचे शिल्पकार, भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार आणि मानवमुक्तीचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज लातूरमध्ये अभिवादन करण्यात आले. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमांतून बाबासाहेबांच्या कार्याचा जागरूक स्मरणोत्सव साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर येथून असंख्य अनुयायांसह मान्यवरांनी पुष्पमाला अर्पण करून डॉ. आंबेडकरांच्या कार्यतत्परतेला आणि त्यांच्या सामाजिक समतेच्या संदेशाला आदरांजली वाहिली. भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित सभेत संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय, बंधुता, स्त्री-पुरुष समानता आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्याचा गौरवपूर्वक आढावा घेण्यात आला. मान्यवरांनी आपल्या भाषणांतून भारताच्या बदलत्या सामाजिक वास्तवात बाबासाहेबांचे विचार अधिक प्रभावी आणि गरज भासवणारे असल्याचे सांगितले. तसेच

आजच्या नव्या पिढीने शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या बाबासाहेबांच्या विचारांचा अंगीकार करून समाजातील विषमता आणि अज्ञानाचा अंधार दूर करावा, असा संदेश दिला. संविधानिक हक्कांचे रक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावादी मूल्यांचे संवर्धन आणि सामाजिक एकोपा यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हाध्यक्ष हिराचंद गायकवाड यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याचा संकल्प व्यक्त केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लातूरमध्ये व्यक्त झालेल्या अभिवादनांमधून त्यांच्या कार्याचा अमर वारसा आणि जनतेतील अभेद्य विश्वास पुन्हा अधोरेखित झाला.

याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे माजी सरचिटणीस अशोक शिंदे, धम्म दीक्षा समिती जिल्हा प्रमुख राहुल गायकवाड, उपप्रमुख सदानंद कापूरे, बौद्धाचार्य ज्ञानोबा इंगळे, विलास आल्टे, प्रेमनाथ कांबळे, संजय गायकवाड, विश्वंभर माने, प्रा.भाऊराव कांबळे, देवदत्त बनसोडे, राजाभाऊ उबाळे, हणमंत कांबळे, लक्ष्मण कांबळे, सिद्धांत चिकटे, डी.पी.भोसले, प्रसेनजीत जोगदंड, भीमराव करवंजे, सुधाताई सोनवणे, सपना देडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# एक व्यक्ती एक मत आणि एकच मूल्य ही बाबासाहेबांचीच ऐतिहासिक देणगी- केशव कांबळे

लातूर-एक व्यक्ती एक मत आणि एकच मूल्य ही जगाच्या लोकशाहीसाठी वाट दाखवणारी संकल्पना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीयांना दिलेली अमूल्य देणगी आहे.




भारत त्या काळी धर्माधिष्ठित जातीय व्यवस्था आणि विषमतेने वेढलेला होता. सामान्य नागरिक, स्त्रिया, अस्पृश्य, कामगार, शेतकरी या सर्वांना मतदानाचा हक्क नाकारण्यात आलेला होता. अशा परिस्थितीत २३ डिसेंबर १९१९ रोजी साऊथ ब्युरो आयोगासमोर बाबासाहेबांनी दिलेली साक्ष ही भारतीय लोकशाहीचे स्वरूप बदलणारी ठरली, असे आवाहन केशव कांबळे यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त वैशाली बुद्धविहार, बौद्धनगर (लातूर) येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला उपस्थित उपासक उपासिकांनी तथागत भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या वेळी बोलताना केशव कांबळे पुढे म्हणाले की,ब्राह्मण, ब्राह्मणेतर,हिंदू आणि अस्पृश्य या घटकांतील खोलवरच्या विषमतेमुळे सत्ता व शिक्षण मोजक्या वर्गापुरते मर्यादित होते. या अन्यायकारक निकषांना छेद देत, संपत्ती-शिक्षणाच्या अटींचा पगडा हटवून, सर्व भारतीय स्त्री-पुरुषांना समान आणि सार्वत्रिक मतदानाचा अधिकार द्यावा, अशी निर्भीड मागणी बाबासाहेबांनी मांडली हे विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले. ते पुढे म्हणाले की, १९२८ मध्ये सायमन कमिशनसमोर, नंतर गोलमेज परिषदेतही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वत्रिक प्रौढ मताधिकारासाठी सातत्याने आवाज उठवला.

ब्रिटिश सरकार, काँग्रेस, उच्चवर्णीय हिंदू आणि मुस्लिम लीग या सर्व शक्तींशी एकाचवेळी झुंज देत असतानाही बाबासाहेबांनी भारतीयांना समान मताधिकार मिळवून देण्यासाठी अपार संघर्ष केला.

भारतीय राज्यघटना तयार करताना आम्ही भारताचे लोक या शब्दांतून सत्तेचे केंद्र स्वतः जनतेकडे देणारे प्रावधान बाबासाहेबांनी नव्या भारताला दिले. यामुळे लोकशाही खर्या अर्थाने लोकांची, लोकांसाठी आणि लोकांद्वारे चालणारी बनली, असे मत कांबळेंनी व्यक्त केले.

मतदान हा फक्त अधिकार नाही, तर भारताचा नागरिक म्हणून आपली ओळख जपण्याचा सर्वोच्च मार्ग आहे. प्रत्येकाने आपल्या मताची किंमत ओळखून मतदानाचा हक्क निष्ठेने बजावला पाहिजे.असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाला समाजबांधवांची उपस्थिती लक्षणीय होती.

# युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लातूर शहरात अभिवादन



लातूर :बहुजन उद्धारकर्ते, विश्वभूषण, विश्वरत्न, आधुनिक नवभारताचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात अत्यंत श्रद्धा आणि कृतज्ञतेच्या वातावरणात अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला. सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समितीच्यावतीने अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महामानव बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

यानंतर पु.भिक्खू संघाने उपस्थितांना त्रिसरण व पंचशील देऊन समाजातील नैतिकता, सामूहिक एकता आणि मानवतावादाचा संदेश दिला.

या प्रसंगी भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक नवभारताचे निर्माते आहेत. ६९ वर्षांपूर्वी त्यांचे महापरिनिर्वाण झाले आणि त्याक्षणी भारताने एक अद्वितीय प्रतिभा, तत्त्वज्ञ आणि जननायक गमावला. त्यांच्या जाण्याने वंचित, शोषित, पीडित समाज पोरका झाला. परंतु आजही त्यांचे संविधान आणि दिलेला बुद्ध धम्म ही आमची पिढ्यानपिढ्यांची शिदोरी आहे. ०६ डिसेंबर हा दिवस प्रत्येकासाठी अत्यंत वेदनादायी असून, करोडो लोकांच्या मनावर आजही त्याचा खोल परिणाम जाणवतो. बाबासाहेबांचा संपूर्ण जीवनप्रवास हा केवळ एका व्यक्तीचा संघर्ष नव्हता, तर तो संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीचा दिव्य संदेश होता. त्यांनी आयुष्यभर शोषित, पीडित, वंचित समाजाला आवाज दिला, स्वाभिमान दिला आणि माणूस म्हणून उभं राहण्याची ताकद दिली. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाने ६९ वर्षांपूर्वी देशाने एक युगप्रवर्तक विचारवंत गमावला, पण त्यांचे ध्येय, त्यांची तत्त्वनिष्ठा आणि मानवतावादी दृष्टी आजही अधिक तेजस्वीपणे मार्गदर्शक आहे.

कार्यक्रमा दरम्यान दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून महामानवांना सामूहिक आदरांजली अर्पण करण्यात आली. अमर रहे अमर रहे बाबासाहेब अमर रहे! या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या प्रसंगी भंते बोधिराज, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, शिक्षक आमदार विक्रम काळे, युवा नेते अजित पाटील कव्हेकर, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार महादेव चिकटे, डी. एस. नरसिंगे, प्रोफेसर डॉ. संजय गवई, भीमराव चौदंते, अनंत लांडगे, मोहन माने, चंद्रकांत चिकटे, राहुल कांबळे, ज्योतिराम लामतुरे, केशव कांबळे, विनय जाकते, वैभव गायकवाड, डॉ. विजय अजनिकर, चिंटू गायकवाड, डी उमाकांत, निखिल गायकवाड, करण ओव्हाळ, राहुल शाक्यमुनी, सचिन गायकवाड, ॲड. रोहित सोमवंशी, डॉ. जितेंद्र वाघमारे, सिद्धांत चिकटे, मिलिंद धावारे, सुजाता अजनिकर, पंचशीला बनसोडे, विद्या ससाणे, सुनीता सोनकांबळे, निर्मला मधाळे, सुमन उडानशिव यांच्या सह समाजातील प्रतिष्ठित मान्यवर, डॉक्टर, वकील, महार बटालियनचे आजी-माजी सैनिक, कर्मचारी तसेच महाविहार धम्मसेवक ग्रुपचे सदस्य, भारतीय बौद्ध सभेचे सर्व पदाधिकारी तथा बौद्ध उपासक उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन केले.

# महात्मा बसवेश्र्वरमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

लातूर-महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील जयंती उत्सव समिती आणि कार्यालय यांच्यावतीने महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांच्या हस्ते महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी प्रोफेसर डॉ. संजय गवई, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शितल येरूळे, प्रा. माधव नायने, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे आणि रत्नेश्र्वर स्वामी यांची उपस्थिती होती.

यावेळी नामदेव बेंदरगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट सांगितला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी महापुरुषांचे विचार आचरणात आणले पाहिजेत तरच समाजाची उन्नती होईल असे आपल्या मनोगतात व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी तर आभार स्टाफ सेक्रेटरी डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मानले.

यावेळी रंगनाथ लांडगे, विनोद दाभाडे, संभाजी लातूरे, सोपान सुतार, ओमकार बोळशेट्टे, योगेश मस्के, अजय गायकवाड, रंगनाथ लांडगे आणि गुरुप्रसाद बिरादार यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर ज्ञानार्थी राहिले -डॉ.दिवाकर कुलकर्णी

छ.संभाजीनगर(प्रतिनिधी)-भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर ज्ञानार्थी राहिले तसेच प्रत्येकाने रहायला पाहिजे असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देवगिरी प्रांत कार्यकारिणी सदस्य डॉ.दिवाकर कुलकर्णी यांनी वसंतराव नाईक महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकराचा १८९७ ते १९२२ हा विद्यार्थी जीवनाचा काळ होता अमेरिकेतून आल्यानंतर कुठेही नौकरी लागली असती ; परंतु देशातील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय परिस्थिती पाहता पुन्हा ते लंडनला शिक्षणासाठी गेले आणि तिथून आल्यानंतर मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत,समता, जनता, प्रबुद्ध भारत हे नियतकालिके सुरू केली आणि या नियतकालिकांतून दलित, पिडित समाजाला शिक्षित करणे, सामाजिक भेदभावाविरूद्ध आवाज उठविणे,जातियभेदभाव नष्ट करून समता प्रस्थापित करणे, महिला आणि कामगारांच्या हक्कांसाठी लढा देणे असा संघर्ष करीत राहिले संभाजी नगरला येऊन मिलिंद हायस्कूल आणि महाविद्यालय सुरू केले, इथे विमानतळ झाले पाहिजे अशी मागणी करणारे बाबासाहेब,महाड चौदार तळ्याचा सत्याग्रह करतात ;परंतु कसलीही हिंसा होऊ देत नाहीत याचीही आपण नोंद घेतली पाहिजे, कोणतेही आंदोलन कायद्याच्या चौकटीत राहून केले पाहिजे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, कामगारांच्या कामाचे तास,समान वेतन,रजा हे सर्व बाबासाहेबांची देण आहे असे ते म्हणाले या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय शिंदे, यांची प्रमुख उपस्थिती होती, कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नितीन राठोड हे होते अध्यक्षीय समारोप करताना नितीन राठोड म्हणाले की,आज बाबासाहेबांच्या विचारांचं स्मरण करून चालणार नाही तर ते विचार आपल्या जीवनात रूजवण्याची गरज आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.चंद्रकांत चोरघडे यांनी केले तर आभार प्रा.पांडुरंग मलवाडे यांनी मानले.




# विधान भवन येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

मुंबई :भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विधानभवन येथे त्यांच्या प्रतिमेस विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



याप्रसंगी उपसचिव स्वाती ताडफळे कक्ष अधिकारी विनोद राठोड, नेहा काळे यासह उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.